# स्वांतत्र्यपूर्व काळातील राजकीय कादंबरी

**प्रा.रेखा काशिनाथ पसाले,** सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगांव

**प्रस्तावना:**

सामाजिक स्थित्यंतर हे समाजात घडणाऱ्या अन्य बदलांवर अवलंबून असते. समाजात होणारे बदल समाजातील अनेक घटकांशी निगडित असतात. त्यातला महत्त्वाचा घटक राजकारण होय. राजकारण ही केवळ एक सामाजिक, राजकीय संस्था नाही. ते एक समाजाच्या सुरक्षाव्यवस्थेची स्वतंत्र अंग आहे. या तत्त्वाशी समाज, देश, त्याचा भूगोल, संस्कृती, भाषा, कला, जीवनमान इत्यादी घटक बांधलेले असतात. कोणत्याही समाजाचा त्याच्या कलांचा अभ्यास करताना त्या समाजाची जीवनशैली, सामाजिकता समजून घेताना त्या समाजात कार्यरत असलेली राजकीय व्यवस्था त्या समाजाच्या घटकांशी तिचा संबंध समजून घ्यावा लागतो. मराठी कादंबरीमध्ये कालांतराने जे अनेक प्रवाह उदयास आले त्यात प्रामुख्याने राजकारण, राजसत्ता, राजकीय प्रणाली, राजकीय पद्धती या समाजामध्ये सामाजिक गरज भागविण्यासाठी समाजातील संस्थांप्रमाणेच सक्रियपणे कार्य करतात. त्यात सातत्य असते त्यामुळे राजकीय पद्धती-प्रणालीनुसार समाजाचा एक राजकीय दृष्टिकोन, एक राजकीय स्वभाव, एक राजकीय जाणीव तयार होते. मराठी समाजाचे ऐतिहासिक, राजकीय स्वरूप, त्यांतील स्थित्यंतरे कधी प्रादेशिक मर्यादेत, तर कधी भारतीय व्यापक परिघात समोर येतात. समाजाचा राजकीय अधिकार, सत्तेत सहभाग, सत्तेचा परिणाम, राजकीय सुरक्षा, राजकीय गुलामी, राजकीय स्वातंत्र्याचा संघर्ष यात होत गेलेला राजकीय बदल या व्यापक परिघात मराठी कादंबरी निर्माण झालेली आहे. त्या राजकीय कांदबरीचे विवेचन प्रस्तुत लेखात केले आहे.

**राजकीय कादंबरीची संकल्पना :**

स्वातंत्र्योत्तर मराठी राजकीय कादंबरी आणि राजकारण याचा वाड्मयाशी संबंध असून राजकीय कादंबरी ही समाजातील घडामोडीच्या संदर्भातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. समाजाशी सतत संबंध राखुन असणारी कादंबरी ही सामाजिक क्रियेचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक असलेल्या राजकारणाशी संबंध जुळवण्यास सक्षम असते. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, मानववंशशास्त्र यांसारखी समाजिक शास्त्रे व मानव्यविद्या, ज्ञानशाखा म्हणून प्रस्थापित होऊ लागल्या त्यातूनच राजकीय कांदबरी उदयास येऊ लागली.

मानवाच्या सामाजिक संबंधांचे स्वरूप जाणून घेण्याची तीव्र इच्छा सामाजिक शास्त्रांप्रमाणे कादंबरीमागेही आहे. राजकारण आणि कादंबरी यांच्यातील अनुबंध यामुळेच आपल्याला गृहीत धरता येतात. समाजाची राजकीय अपरिहार्यता आणि कादंबरीची समाजसापेक्ष प्रगती स्पष्ट केली आहे. कादंबरी हा समाजाच्या आधुनिक प्रकृतीचा आविष्कार असल्याचेही सूचित होते. राजकारण समाजाच्या व्यापक प्रकृतीचाच भाग होय. समाजाचे व्यापक स्वरूप कादंबरीसारख्या लेखनात पोषक, प्रेरणादायी असल्याने समाजाला समजून घेत, त्याचे स्वरूप व्यक्त करावयाचे ध्येय कादंबरी लेखनात प्रमुख असल्याने समाजाचे राजकीय जीवनही कादंबरीचा विषय होणे स्वाभाविक आहे. राजकारण, राजकीयत्व कादंबरीच्या आशयाशी, विषयाशी संबंधित असा घटक असल्याचे प्रथमदर्शनी जाणवते म्हणून तिच्या आशयाला, विषयाला राजकीय प्रकृती प्राप्त होते.

विसाव्या शतकात सामाजिक, राजकीय परिवर्तनाला गती प्राप्त झाली. भारत स्वतंत्र झाला. लोकशाही शासनव्यवस्था अस्तित्वात आली. या शासनव्यवस्थेसमोर नवीन प्रश्न निर्माण झाले. सामाजिक, आर्थिक अशा प्रश्नांना तोंड देणे भारताला पहिल्यांदा भाग पडले. त्यातून एक नवीन विचारसरणी अस्तित्वात आली. अर्थातच नवीन प्रश्नांना सोडविण्यासाठी नव्या विचारसरणीचा जन्म झाला. त्यात वाद-विवाद झाले, मतभेद झाले व त्यातूनच ईर्ष्या, द्वेष, मत्सर वाटा फुटल्यात, त्यातून राजकारण करणाऱ्यांना संधी मिळत गेली यांच्यातील वादविवादातून राजकीय लिखाण करणाऱ्यांना संदर्भ मिळत गेलेत आणि राजकारणाचे चित्रण साहित्यातून होऊ लागले. राजकारणाचे स्वरूप हे प्रामुख्याने राजकीय व्यवस्थेवर आधारलेले असते. भारतात राजकारणाचे स्वरूप हे प्रामुख्याने राजकीय व्यवस्थेवर आधारलेले असते जसे लोकशाही की हुकूमशाही? भारतात लोकशाही शासनपद्धती असल्यामुळे येथे वेगवेगळ्या धार्मिक समुदायाचा संबंध प्रस्थापित झाला.

अशा पद्धतीने कादंबरीतील कथानक हे एका व्यक्तीचे न राहता एका समूहाचे म्हणून येते आणि या समूहाचा जो संघर्ष असतो तो दुसऱ्या समूहाच्या हातून सत्ता काबीज करण्यासाठी चालू असतो. तो संघर्ष दलित किंवा स्त्रीवादी कादंबरीसारखा नसतो. दलित कादंबरीतील संघर्ष हा समूहाचाच असतो पण तो न्याय मागण्यासाठी असतो, विद्रोहासाठी असतो. राजकीय कादंबरीतील संघर्ष सत्तेच्या राजकारणाचे चित्रण करण्यासाठी असतो म्हणून ज्या कादंबरीमध्ये सत्ता संघर्ष असतो त्या कादंबरीला राजकीय स्वरूपाची कादंबरी म्हणता येईल..

**राजकीय कादंबरीचे स्वरूप :**

राजकीय कादंबरीतील विषय किंबहुना राजकीय कादंबरीतील आशय हा राजकारण आणि जनता यांच्या माध्यमातून मांडलेला असतो. यातील आशय, विषय हे विशिष्ट कथानकाची मांडणी करून, राजकीय वातावरणावरून तयार करून लेखक राजकारणाचे चित्रण करतो. शासन, त्याची जनतेकडे पाहण्याची दृष्टी, त्यांनी केलेले कायदे, त्यांची झालेली अंमलबजावणी, समाजात त्यांच्या कार्याचा झालेला परिणाम, त्यांचा समाजावर पडलेला प्रभाव, समाज राज्यकर्त्यांबद्दल व्यक्त करीत असलेल्या प्रतिक्रिया, समाजहित साधणारी राजकीय मंडळी, स्वहितासाठी संघर्ष करणारी राजकीय मंडळी ही राजकीय वैशिष्ट्ये असतात. राजकीय कादंबरीत व्यक्तींशी तर समुदायाशी संघर्ष असतो.राजकीय व्यक्तीला नाही तर समाजाला महत्त्व असते.

राजकीय कादंबरीतील राग, द्वेष, मत्सर, लोभ हे सर्व समाजाला पुढे ठेवून मांडलेले असतात. राज्यव्यवस्थेशी नायकाचा संघर्ष हा समाजाला पुढे करून चालू असतो. समाज हा मूळ गाभा असतो. व्यक्तीचा संघर्ष हा समाजासाठी असतो. ती समाजाचा नेता असते. म्हणून समाजासाठी संघर्षाला येथे महत्त्वाचे स्थान असते. व्यक्तीच्या वैयक्तिक संघर्षाला या ठिकाणी महत्त्वाचे स्थान नसते. त्याचा समाजासाठी त्याग हा समाज म्हणून मोठा असतो. त्यामुळे राजकीय कादंबरीत व्यक्ती गौण असून समाज हाच महत्त्वाचा गणला जातो.

राजकारण हा राजकीय कादंबरीचा मूळ गाभा असतो. मुळात कादंबरी हा वाङ्मय प्रकार असा आहे कालखंडाचा व्यापक आशय कादंबरीतून मांडता येतो. परिवर्तनासाठी इतिहास मानवाच्या ऱ्हासाची कारणे सांगतो म्हणून काही समाजसुधारक समाजाच्या उद्धारासाठी चळवळी घडवून आणतात. यात काही नवीन मूल्यांचा स्वीकार करतात काही जुन्या मूल्यांशी बांधील असतात. यातून वाद होतात. या वादांतून समाजाची एक नवी दृष्टी तयार होते. राजकारणी मंडळी याचा उपयोग हातात सत्ता ठेवण्यासाठी करतात, यातून संघर्ष होतो. हा संघर्ष राजकीय कादंबरीचा संदर्भ ठरतो. सामाजिक संघर्ष, भौगोलिक संघर्ष, आर्थिक संघर्ष ही राजकीय कादंबरीची वैशिष्ट्ये ठरतात. या कादंबरीत जे वाद-विवाद असतात ते राज्यव्यवस्थेशी निगडित असतात.

राजकीय कादंबरी ही राज्यव्यवस्थेशी निगडित अशी कलाकृती असते. त्यातील नायकाचा संघर्ष हा समाजासाठी असतो. त्यात व्यक्तीचे वैयक्तिक जीवन महत्त्वाचे नसते तर व्यक्तीच्या समस्यांना तेथील राजकारण कारणीभूत ठरावे अशी ती घटना असते. निखळ राजकीय कादंबरीत राजकारण आणि जनता असा विषय महत्त्वाचा असतो. राजकीय कादंबरीचे हे विशेष ठरतात. त्यातील संघर्ष हा समूह संघर्ष असतो. त्यातील व्यक्तीचा संघर्ष हा समूहासाठी असतो, जनतेसाठी असतो. म्हणून राजकीय कादंबरी समूहाला समोर ठेवून लिहिली जाते.

**मराठीतील राजकीय कादंबरी :**

कादंबरी वाङ्मय प्रकारातील राजकीय कादंबरी ही अगदी अलीकडच्या काळात उदयास आली. किंबहुना विसाव्या शतकातील तिसऱ्या दशकामध्ये राजकीय कादंबरीचा उदय झाला. मराठीतील पहिली राजकीय कादंबरी म्हणून ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'मुक्तात्मा' या कादंबरीला मान दिला गेला. अर्थात या बद्दल विविध मतमंतात्तरे आहेत. प्र. वा. बापट आणि ना. वा. गोडबोले लिहितात, 'मुक्तात्मा' पूर्वी लिहिलेली मराठीतील पहिली राजकीय स्वरूपाची कादंबरी श्री. दत्तो अप्पाजी तुळजापूरकर यांची 'माझे रामायण' (१९२७) ही होय. रानडे व कुंटे युगापासून सुरुवात होऊन या कादंबरीचा शेवट जालियनवाला बाग प्रकरणात होतो. अशा प्रकारे जवळजवळ पन्नास वर्षांचा कालखंड या कादंबरीने व्यापला आहे. तथापि या कादंबरीत सामाजिक जीवनावरच अधिक भर असल्याने या कादंबरीला सामाजिक की राजकीय सदरात घालावे

याविषयी टीकाकारांत भिन्न मते होण्याचा संभव आहे. ग. त्र्यं. माडखोलकरांची 'मुक्तात्मा' (१९३३) ही मराठी भाषेतील पहिली राजकीय कादंबरी म्हणता येईल. याच बरोबर दत्तो अप्पाजी तुळजापूरकर यांची 'माझे रामायण', मामा वरेरकर यांची 'धावटा धोटा', ल. बा. भोयरकर यांची 'मृत्यूच्या मांडीवर', रा. क. भावे यांची 'खरा देशभक्त', रा. बा. शास्त्री यांनी 'अमावास्या', ग. ल. ठोकळ यांनी 'गावगुंड', लीला देशमुख यांनी 'पूर्वेचा वारा' या राजकीय कादंबरी सागंता येतील.

**सारांश :**

सामाजिक जीवनातील हरतऱ्हेच्या समस्या मराठी कादंबरीकारांनी हिरिरीने मांडलेल्या आहेत. ऐतिहासिक कादंबऱ्याही पुष्कळ आहेत. राजे-रजवाडे वा इतिहाकालीन राजकीय नेते यांच्याविषयी लिहिलं म्हणजे कादंबरी ऐतिहासिक ठरेल. पण ती राजकीय असेलच असं नाही. तर येणेप्रमाणे मराठी कादंबरीकारांनी कौटुंबिक, सामाजिक, वैयक्तिक, ऐतिहासिक असे विविध विषय हाताळले आहेत. राजकीय विषयाला मात्र काहींनीच हात घातलेला आहे. मराठी लेखकांनी वैयक्तिक, कौटुंबिक जीवनातील, व्यवहारातील राजकारणावर भरभरून लिहिलेलं आहे. पण सत्ता, निवडणुका, राजकीय चळवळी, सामाजिक चळवळींची राजकीय बाजू, सत्ताकारणाचे सर्वसामान्यांवर होणारे परिणाम यापासून मात्र आपले लेखक शक्यतो चार हात दूरच राहिले आहेत. राजकीय कादंबरीची सशक्त परंपरा पाहायला मिळत नाही. येथे राजकारणाचा, राजप्रणालींचा, राजकीय विचारांचा वेगाने विकास झालेला आहे. राजकीय कादंबरीचा एक कादंबरीची स्वतंत्र शाखा मानावी, स्वतंत्र राजकीय कादंबरीचे साहित्यशास्त्र मानावे इतपत मराठी राजकीय कादंबरीचा विकास झालेला दिसत नाही मात्र तिचा वेगाने विकास होत आहे. एक वेगळा प्रवाह म्हणून नोंद घेण्याइतपत तिचा वेगळेपण जाणवायला लागलेले आहे.

**संदर्भसूची :**

१. रायकर सीताराम, "राजकीय कादंबर", नवभारत, दिवाळी विशेषांक- १९९६, वाई, जि. सातारा.

२. कुलकर्णी गो. म, 'नवसमीक्षा : काही विचार प्रवाह', संपा.- गो. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग, १९८२,

३. कुलकर्णी अरविंद वामन, साहित्य विचार, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, १९९२.

४.गजेंद्रगड व्ही. एन., 'राजकीय समाजशास्त्रीय संशोधन', प्रतिमा प्रकाशन, डोंबिवली, २०००.

५.कुलकर्णी बी. वाय., 'राजकीय समाजशास्त्र', विद्या प्रकाशन, रुईकर रोड, नागपूर